# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### गुंज (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथील एका ट्रेडर्सला आग लागल्याबाबत

**(१) ४५६६० (२५-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुंज (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथील एका ट्रेडर्सला माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीत किती मुद्देमालाचे नुकसान झाले आहे, तसेच आग लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त नुकसानग्रस्तांना शासनाने कोणती मदत केली आहे, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे. प्रभुदेव ट्रेडर्स, गुंज, ता. महागांव, जि. यवतमाळ या दुकानास दिनांक १०.०५.२०२२ रोजी आग लागल्याची पोलीस स्टेशन महागांव येथे नोंद करण्यात आली आहे.

(२) व (३) सदर आगीत हळद, चना, तुर, गहु, बारदाना, हळद फ़िल्टर, २ ईलेक्ट्रिक मशिन (काटा), धान्य चाळणी, ताडपत्री, गोदामाचे टिन शेड अशा एकूण ९६ लाख ८५ हजार रुपयांच्या मालाचे जळून नुकसान झाले आहे. सदर आग लागण्याचे कारण समजू शकलेले नाही. याप्रकरणी कोणत्याही प्रकारची मदत शासनाकडून करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद जिल्ह्यातील सातारा येथील सिल्क मिल्स कॉलनीत भोंगे लावल्याने गुन्हा दाखल केल्याबाबत

**(२) ४५९७७ (३१-१०-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील सातारा येथील सिल्क मिल्स कॉलनीत भोंगे लावून हनुमान चालीसा लावल्यामुळे श्री.किशोर मुलानाईक यांच्यावर गुन्हा दाखल केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार भोंग्यावर हनुमान चालीसा लावल्यामुळे कोणत्या स्वरुपाचे व कोणत्या कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२४) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी दोन धर्म, निरनिराळ्या गटांमध्ये शत्रुत्व वाढेल आणि एकोप्यास बाधा होईल तसेच सार्वजनिक शांतता भंग पाऊन लोकांमध्ये भिती निर्माण होईल व दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याच्या दृष्टीने व यापासून दोन गटात व समाजामध्ये अशांतता निर्माण होईल याची जाणीव असताना त्या उद्देशाने लाऊड स्पिकर वर नमाज पठन

करण्याचे वेळी जानुन बुजुन ब्लु टूथ स्पिकरवर हनुमान चालीसा/गाणे वाजवले असल्याचे सदर प्रकरणातील साक्षिदाराचे सांगण्यावरुन पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी दोषीवर २४/०४/२०२२ रोजी पोलीस स्टेशन सातारा, औरंगाबाद शहर(सध्या- संभाजीनगर) येथे भादंवि कलम कलम ५०५ (१) (ब), ५०५ (१)(क) १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे गु. र. क्र. १३८/२०२२ दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हयाचे तपासात घटनास्थळी ०२ शासकीय पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला आहे. सदर घटनास्थळी एक boat कंपनीचा पोर्टेबल ब्लु टुथ स्पिकर मिळुन आल्याने तो पंचासमक्ष गुन्हयाचे तपासकामी जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीसांकडून सुरु आहे.
४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कांदिवली पूर्व येथील ठाकूर गाव परिसरातील मशिदीवर लावण्यात आलेल्या भोंग्याबाबत

**(३) ६४७८८ (२७-०९-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदिवली पूर्व येथील ठाकूर गाव परिसरातील मशिदीवर लावण्यात आलेल्या भोंग्या संदर्भातील तक्रारींकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे मे २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मशिदीचा परिसर शांतता क्षेत्र नसल्याचे पोलिसांतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिसांकडून कोणतीही कारवाई न होण्याची नेमकी काय कारणे आहेत,
(४) असल्यास, ध्वनी प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२४) :** (१) नाही.
(२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-अ दि. ३०/११/२०१७ च्या अधिसूचनानुसार गौसिया मस्जिद, लक्ष्मीनगर, ठाकुर गाव, कांदीवली (पु.) या मशिदीचा परिसर शांतता क्षेत्र नसल्याबाबत नमुद करण्यात आलेले आहे.
त्यामुळे, गौसिया मस्जिदवरील लाऊडस्पिकर संदर्भात मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या क्रिमिनल रिट याचिका क्र. ६६०५/२३ संदर्भात पोलीसांनी नमुद राजपत्रास अनुसरून सदर मशिदीचा परिसर शांतता क्षेत्र नसल्याबाबत मा. न्यायालयास शपथपत्र सादर केले आहे, हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
गौसिया मस्जिद, लक्ष्मीनगर, ठाकुर गाव, कांदीवली पु. या ठिकाणी वेळोवेळी ध्वनिमापन यंत्राने ध्वनिमापक यंत्राने ध्वनीची तिव्रता मोजुन नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.
दि. १२/०५/२०२३ रोजी धार्मिक अजान, बयान चालु असताना तसेच सामान्य वातावरणात त्याठिकाणी होत असलेल्या ध्वनिची तीव्रता मोजुन त्याप्रमाणे नोंदी घेवुन पोलीसांनी पंचनामा केला आहे. सदर ट्रस्टचे पदाधिकारी यांनी त्यांना देण्यात आलेल्या ध्वनिक्षेपक परवान्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन करून मस्जिदीवरील ध्वनिक्षेपकामुळे ध्वनिप्रदुषण नियम २००० मधिल तरतुदींचा भंग केल्याबाबतचा अहवाल प्राधिकृत अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सायन, पु, मुंबई यांना समतानगर पोलीस ठाणे यांच्याकडून दि.२६/०५/२०२३ रोजी पाठविला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जमुनानगर (जि.जालना) येथील एका महिलेची तिच्या पतीने केलेली हत्या**

**(४) ६९७४१ (०१-०९-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमती शितल सचिन झोटे यांचा दिनांक २२ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता ऑपेक्स रुग्णालय, औरंगाबाद येथे मृत्यु झाला असून या संशयास्पद मृत्यूप्रकरणी भारतीय दंड संहिता कलम ३०२, ४९८ अे ३४, १२० बी, २०१ आणि २०४ अन्वये चौकशी होऊन कारवाई होण्यासंदर्भात मयत महिलेच्या भावाने श्री. रंजन सुरेश जाधव यांनी दिनांक ५ मे, २०२३ रोजी पोलीस महानिरिक्षक संभाजीनगर परिक्षेत्र, पोलीस महानिरिक्षक, महिला व बालक गुन्हे प्रतिबंधक, म.रा. पोलीस अधिक्षक, जालना, अतिरिक्त मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मा. उपमुख्यमंत्री तथा मा. गृहमंत्री आणि मा. मुख्यमंत्री आदिकडे सविस्तर लेखी निवेदनाव्दारे कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय;

(२) या गंभीर गुन्हाचा जलदगतीने व्हावा या हेतूने भारतीय दंड संहिता कलम ३०२, ४९८ अे ३४, १२० बी, २०१ आणि २०४ आदी कलम तक्रारी मध्ये नोंदवून चौकशी अधिकाऱ्यांनी निपक्षपातीपणे व प्रामाणिकपणे चौकशी करावी, अशी अपेक्षा धरून पोलीस महानिरीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक, संभाजीनगर परीक्षेत्र यांचे कार्यालय यांचेकडे दिनांक ३१ जानेवारी, २०२३, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२३ व दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजी अशी वारंवार लेखी निवेदने सादर करून मागणी केली असता वा संबंधीत पोलीस स्टेशनने जाणीवपूर्वक भारतीय दंड संहिता कलम ४९८ अे, ३०२, २०१, २०४, ३५४ सी, ३५४ डी आणि १२० बी ही कलमे लावल्याचे टाळले असल्याने चौकशी पथकाबाबत संशय निर्माण झाला असल्याचे दिनांक ५ मे २०२३ रोजीच्या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे, हेही खरे आहे काय;

(३) असल्यास, मयत श्रीमती शितल सचिन झोटे यांना त्याचे पती श्री.सचिन आत्माराम झोटे, नणंद श्रीमती मंजुशा गौतम खरात व श्रीमती लीलाबाई आत्माराम झोटे यांच्याकडून शारिरीक व मानसिक छळ/ त्रास देण्यात येत होता यासंदर्भात सविस्तररीत्या दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी जालना पोलीस स्टेशन मध्ये या गुन्ह्याबाबत नोंदविलेल्या 'प्रथम स्तरावर अहवाल' मध्ये नमूद करण्यात आले आहे, हेही खरे आहे काय;

(४) मयत श्रीमती शितल सचिन झोटे यांच्या नणंद श्रीमती मंजुशा उर्फ दमयंती खरात या सदर प्रकरणात आरोपी क्र.२ म्हणून प्रथम खवर अहवालात नोंद करण्यात आली आहे. तसेच त्या पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद यांच्या कार्यालयात मुख्य लिपिक म्हणून कार्यरत असल्याने, आपल्या पदाचा गैर वापर करून, सदर प्रकरणी दबाव आणण्याचा व दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्याचे नमूद करत पोलीस महानिरीक्षक, संभाजी नगर परीक्षेत्र व अन्य सर्वसंबंधीतांना दिनांक ५ मे २०२३ रोजी सादर केलेल्या लेखी निवेदनात स्पष्ट केले आहे, हेही खरे आहे काय;

(५) असल्यास, यासंपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय;

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे व येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२४) :** (१) सदर प्रकरणी विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, पोलीस अधिक्षक, जालना, मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री कार्यालयात निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) दिनांक ५ मे,२०२३ रोजीचे निवेदन विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर कार्यालयास प्राप्त असून सदर निवेदन चौकशीकामी पोलीस अधिक्षक, जालना यांना पाठविण्यात आले आहे.

(३) मयत हिला शारिरीक व मानसिक त्रास दिल्याप्रकरणी पोलीस स्टेशन, तालुका जालना येथे तीन आरोपींविरुध्द प्रथम खबरी अहवाल दि. २२.०१.२०२३ रोजी नोंदवण्यात आला आहे.

४)) दिनांक ५ मे,२०२३ रोजीचे निवेदन विशेष पोलीस महानिरीक्षक, छ. संभाजीनगर परिक्षेत्र, छ. संभाजीनगर यांचे कार्यालयास प्राप्त झाले. सदर निवेदन चौकशीकामी पोलीस अधिक्षक, जालना यांना पाठविण्यात आले असून पोलीस अधिक्षक, जालना यांनी सदर अर्जाची निपक्ष चौकशी केली असता चौकशीमध्ये असा कोणताही प्रकार घडल्याचे

निष्पन्न झालेले नाही.

(५) व (६) सदर प्रकरणी तालुका जालना पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.४२/२०२३, कलम ३०४ (अ), २७९, ३३८, ३२३, ५०४, ५०६, ३४ भा.द.वि. सह वाढीव कलम ४९८ (अ) अन्वये दिनांक २२.०१.२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्यातील तीन आरोपी अटक असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

---

**संक्रमण शिबिरात रहात असलेल्या भाडेकरू कडून इतर दोन ते तीन रहिवाश्यांना गाळा विक्री केल्याबाबत.**

**(५) ६९८६३ (०४-०९-२०२३). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संक्रमण शिबिरात राहत असणारे भाडेकरू आपला गाळा इतर दोन-तीन जणांना विकत असल्याचे मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जे भाडेकरू गाळा विकतात त्याचा विक्री करारनामा नसला तरी देखील शासन ग्राह्य धरणार आहे काय,

(३) असल्यास, सदर शिबिरातील भाडेकरूकडून गाळा खरेदी करुन फसवणूक झालेल्या रहिवाशांची भविष्यात फसवणूक होऊ नये याकरिता शाससनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एकच गाळा अनेकांना विक्री करणा-या भाडेकरुविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२१-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) संक्रमण शिबीरातील रहिवाश्यांबाबत शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१४ / प्र.क्र.१०२ (भाग-१) /दुवपु-२, दि.१३.०९.२०१९ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर निर्णयामध्ये संक्रमण शिबीरातील भाडेकरू कडून गाळा खरेदी केलेल्या रहिवाशांना वर्गवारी ¨ब ° मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

या प्रवर्गातील गाळेधारकांनी मूळ गाळेधारकांना काही आर्थिक मोबदला देऊन मुखत्यारपत्र ( Power of attorney) किंवा तत्सम प्राधिकार पत्राद्वारे अनियमित / बेकायदेशीर व्यवहार जरी केला असला व तो व्यवहार जरी बेकायदेशीर असला तरीही झालेल्या व्यवहारामध्ये त्यांनी काही आर्थिक रक्कम दिली असल्याने, सहानुभूतीपुर्वक दृष्टीकोनातून या प्रवर्गातील गाळे धारकाकडून ते सध्या रहात असलेल्या संक्रमण शिबीरातील गाळयाच्या क्षेत्रफळा इतकी सदनिकेच्या बांधकाम खर्चाची रक्कम (Construction cost) अधिक सदरहू पुनर्वसित गाळयास पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सोयी-सुविधांचा खर्च त्यांच्याकडून वसूल करण्यात यावा.याप्रमाणे बांधकाम खर्च, पायाभूत सोयी-सुविधांवरील खर्च वसूल करून, पुनर्वाटप करण्यात येणारे गाळे त्यांच्या नावावर हस्तांतरीत करण्यात यावेत. यासाठी मुद्रांक शुल्क व लागू असलेल्या इतर कोणत्याही प्रकारच्या शासकीय शुल्काची रक्कम गाळेधारकाने भरणे आवश्यक राहील.

उक्त शासन निर्णयानुसार वर्गवारी ¨ब ° मधील रहिवाशांबाबत कार्यवाही करण्यात येईल.तथापि, सदर शासन निर्णयाच्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.०१/२०२० दाखल करण्यात आली असून, सदर याचिकेमध्ये मा.न्यायालयाने दि.२०.१०.२०२० च्या आदेशान्वये पुढील आदेशापर्यंत उक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे.

(४) संक्रमण शिबीरात वास्तव करीत असलेल्या भाडेकरू / रहिवाश्याने संक्रमण गाळा विकल्याचे निदर्शनास आल्यास अश्या भाडेकरू /रहिवाश्यांवर म्हाड कायदा,१९७६ कलम ९५ (अ) (३) नुसार निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते. तसेच संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाने वांद्रे रिक्लेमेसन,आदर्श नगर,अभ्युदयनगर वसाहतींचा विकास मोतीलाल नगरच्या पुर्नविकास योजनेनुसार करण्याबाबत**

**(६) ७१९७४ (१३-०२-२०२४). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने वांद्रे रिक्लेमेसन,आदर्श नगर,अभ्युदयनगर वसाहतींचा विकास मोतीलाल नगरच्या पुर्नविकास योजनेनुसार म्हणजे कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सीमार्फत करण्याच्या प्रस्ताव दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मान्यतेसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, हया वसाहतींचा म्हाडाने बीडीडी चाळ प्रकल्पाप्रमाणे पुर्नविकास न करता अश्याप्रकारे कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सीमार्फत विकास करण्याच्या प्रस्ताव सादर करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, म्हाडाच्या प्रस्तावास शासनाने कोणत्या मुद्दांच्या आधारे मान्यता दिली असून हयाप्रस्तावाच्या माध्यमातून म्हाडाला कश्याप्रकारे लाभ होणार आहे व नागरीकांना विक्रिसाठी किती सदनिका उपलब्ध होणार आहेत?

**श्री. अतुल सावे (१९-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास विनियम ३३(९) बी अंतर्गत म्हाडामार्फत करतांना या प्रकल्पासाठी लागणारा खर्च म्हाडाला करावा लागणार आहे व त्यासाठी म्हाडाचा बहुतांश निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. तर वांद्रे रिक्लेमेशन, आदर्श नगर वरळी व अभ्युदय नगर (काळाचौकी) या तीन वसाहतींचा पुनर्विकास विनियम ३३(५) अंतर्गत कंस्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सीची नियुक्ती करुन केल्यास, म्हाडाची कोणतीही आर्थिक गुंतवणूक न होता अभिन्यासातील अस्तित्वातील रहिवाश्यांचे विनामूल्य पुनर्वसन होऊन म्हाडास अधिमूल्य व विनामूल्य गृहसाठा प्राप्त होणार आहे.

(३) म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास करतांना उत्तम दर्जाच्या इमारती व सोयीसुविधा निर्माण होण्याच्या दृष्टिने संपूर्ण अभिन्यासाचा एकत्रित पुनर्विकास होणे आवश्यक आहे. यामुळे अभ्युदय नगर (काळाचौकी) या म्हाडा अभिन्यासातील इमारतींचा एकत्रित/समूह पुनर्विकास करण्याबाबत दि.६/३/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

म्हाडास या प्रकल्पातून किमान रु.८७५ कोटी अधिमुल्य व गृहसाठा हिस्सा अंदाजे ४०,४०० चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ उपलब्ध होणार आहे. अशाप्रकारे म्हाडास अंदाजे एकूण १८४२ कोटी महसुल प्राप्त होवू शकतो.

---

**मौजे कोंडउमरे (ता संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील शास्त्री नदीवर टवळी या जागी कोल्हापूर टाईप बंधारा बांधण्याबाबत**

**(७) ७२९३७ (१३-०२-२०२४). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोंडउमरे (ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील शास्त्री नदीवर टवळी या जागी कोल्हापूर टाईप बंधारा बांधण्यात यावा, अशी मागणी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान ग्रामस्थांकडून शासनास करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थांच्या तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार कोल्हापूर टाईप के.टी बंधारा बांधण्याच्या ठिकाणास संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी जागेची पाहणी करुन त्यास मान्यता दिल्यावर, सदर कोल्हापूर टाईप बंधाऱ्याच्या ड्रिलिंगचे काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित कामासाठी निधीची तरतूद नसल्याने काम प्रलंबित असल्याचे दि. १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंधारण मंत्री यांचेकडे दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये पुन्हा केली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरच्या कोल्हापूर टाईप बंधाऱ्याचे काम पूर्ण झाल्यास त्या परिसरातील मौजे कोंडउमरे, हेदली, अंत्रवली, कळंबस्ते या गावांसह अन्य गावांना देखील शेती, पशुधन व पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून त्याद्वारे पाणीटंचाईचा प्रश्न सुटणार असल्याने सदर काम पूर्ण करण्यासाठी शासनाने चौकशी करुन उक्त कामासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१८-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
मौजे कोंडउमरे येथे टवळी येथे कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याकरीता सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. तथापि, ग्रामस्थ हेदली यांनी सदरील बंधा-यास विरोध असल्याचे दि. ३१.१०.२०२३ च्या पत्रान्वये कळविले असल्याने काम सद्यस्थितीत प्रलंबित आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मौजे कोंडउमरे येथे शास्त्री नदीवर बंधारा बांधण्याबाबत मौजे कोंडउमरे ग्रामपंचायतीने मागणी केली असून मौजे हेदली, अंत्रवली, कळंबस्ते व इतर ग्रामपंचायतींनी सदर बंधा-याबाबत मागणी केलेली नाही. सदरील बंधा-याचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम पूर्ण झालेले असून बंधा-याच्या मुख्य कामाच्या प्रशासकीय मंजुरीच्या अनुषंगाने दोन्ही तिरावरील मौजे कोंडउमरे व मौजे हेदली ग्रामपंचायतीचा ग्रामसभा ठराव अद्याप अप्राप्त असल्याने व मौजे हेदली येथील ग्रामस्थ यांनी बंधा-यास विरोध असल्याचे दि. ३१.१०.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यामुळे याप्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही. ठराव प्राप्त होताच को.प. बंधा-याचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जत (जि.सांगली) तालुक्याच्या शेवटच्या गावापर्यंत पाणी पोहचविण्याबाबत

**(८) ७३३६२ (१७-०२-२०२४). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुक्याच्या शेवटच्या गावापर्यंत पाणी पोहचविण्याचे उद्योग मंत्री यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये आश्वासन देवूनही अद्यापी कामाला सुरुवात करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने सदर कामाची निविदा लवकर काढून विस्तारीत सिंचन योजनेच्या कामाला त्वरीत सुरुवात करणेबाबत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही. म्हैसाळ विस्तारीत जत उपसा सिंचन योजनेच्या शीर्ष कामास जून, २०२३ मध्ये कार्यारंभ आदेश देऊन दि.०५.१०.२०२३ पासून कामास सुरूवात झाली आहे. एकूण ५७ किमी पैकी २३ किमी खोदकाम पूर्ण झाले असून १९ किमी नलिकेचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत काम प्रगतीत आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जत (जि.सांगली) येथील म्हैसाळ योजनेसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत

**(९) ७३३८४ (२९-०२-२०२४). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) येथील म्हैसाळ योजनेतून वंचित राहिलेल्या वा अत्यल्प पाणीपुरवठा होणाऱ्या ६५ गावांसाठी मंजूर झालेल्या विस्तारीत म्हैसाळ योजनेच्या कामाला सुरुवात झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेच्या कामामुळे येथील पाणीप्रश्न सुटणार असल्याने या योजनेला आवश्यक निधी उपलब्ध करणेसह सदर योजनेचे काम निर्धारित वेळेत पूर्ण व्हावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) होय.

म्हैसाळ विस्तारीत जत उपसा सिंचन योजनेच्या शीर्ष कामास दि.०५.१०.२०२३ पासून सुरुवात झाली असून एकूण ५७ किमी लांबीपैकी सुमारे १७ किमी लांबीचे खोदकाम पूर्ण झाले आहे. तसेच सुमारे १४ किमी लांबीचे नलिका अंथरण्याचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम प्रगतीत आहे.

(२) म्हैसाळ विस्तारीत जत उपसा सिंचन योजनेच्या शीर्ष कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण होवून कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच शीर्ष कामापुढील मुचंडी-लवंगा, कोळगिरी गुड्डापूर गुरुत्व नलिका तसेच त्यावरील उमराणी व वाषाण वितरीकेचे बंदिस्त नलीकेद्वारे कामाच्या निविदेची कार्यवाही प्रगतीपथावर असून, सदर निविदा कार्यवाही पूर्ण करून, कामे सुरु करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील अनसिंग येथील गाव तलावाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) ७३४०० (१३-०२-२०२४). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव जलसंधारण विभागाच्यावतीने गेल्या २५ ते ३० वर्षापूर्वी अनसिंग येथील गाव तलावाची निर्मिती करण्यात आली, परंतु सदरहू तलावाची संबंधिताकडून पुरेशी व योग्य प्रमाणात देखभाल दुरुस्ती करण्यात आली नसल्याने सदरील तलाव धोकादायक झाले असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाची मालेगाव जलसंधारण विभागातील अधिकारी यांनी पाहणी केली असता तलावाच्या स्थितीची माहिती त्यांनी संबंधित वरिष्ठांना दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनसिंग गांव तलावाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (१८-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर गांव तलाव दुरुस्तीच्या कामास नियमित निधी ल.पा. योजना अंतर्गत मंजूर करण्यात आले होते. त्यानुसार सदर कामाच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकामध्ये नमूद बाब साफसफाई भिंतीच्या माथ्यावरील भरावा, दगडी अश्मपटल चे काम, उर्ध्व बाजूस काळया मातीचे आवरण इत्यादी कामे कंत्राटदाराकडून पूर्ण करुन घेण्यात आली आहे. धरणास धोका परिस्थितीमधून बाहेर काढण्यात आले आहे. सदर कामावर रु. ९,७७,७२५/- एवढा खर्च झालेला आहे. सदर काम दि. २५.०३.२०२४ ला पूर्ण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील विजापूर सोलापूर महामार्गावरील वडकबाळ येथील सीना नदीवर बंधाऱ्याचे काम मंजूर झाल्याबाबत

**(११) ७३४९१ (१४-०२-२०२४). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील विजापूर सोलापूर महामार्गावरील वडकबाळ येथील सीना नदीवर ब्रिज कम बंधाऱ्याचे काम मंजूर झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ब्रिज कम बंधाऱ्यामुळे दक्षिण सोलापूर तालुक्यातील २९९ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार असल्याने येथील शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर बंधाऱ्याचे काम सुरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
केंद्र शासनाच्या वाहतूक व महामार्ग मंत्रालयामार्फत सदर काम मंजूर असून या कामास शासनाचे पत्र दि.२५.०६.२०१९ अन्वये सीना नदीवर वडकबाळ येथे पूल वजा बंधारा बांधण्याबाबत ना-हरकत देण्यात आली आहे. सदर पत्रात पूल वजा बंधा-याचे बांधकाम व पहिले ३ वर्षाच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च केंद्र शासनाचे वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचेमार्फत करावा व त्यानंतर देखभाल दुरुस्तीचा खर्च जलसंपदा विभागाकडून करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे.
(२) होय.
(३) सीना नदीवरील ब्रिज कम बंधाऱ्याचे काम शासनाचे दि.०१/११/२०१८ च्या पत्रान्वये प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. वडकबाळ येथील ब्रिज कम बंधाऱ्याच्या संकल्पनास क्षेत्रिय मुख्य अभियंता, कार्यालयाचे पत्र क्र. मुअ (विप्र) /उअ-३(१)/१२५३, दि.१२/०४/२०२३ अन्वये तांत्रिक सहमती दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उजनी जलाशयातून भीमा-सिना(जि.सोलापूर) या जोड कालव्यासाठी झालेल्या पाण्याचे फेरनियोजन होणेबाबत

**(१२) ७३५०५ (१७-०२-२०२४). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील उजनी जलाशयातून भीमा-सिना या जोड कालव्यासाठी झालेल्या पाण्याचे फेरनियोजन होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधिक्षक अभियंता भीमा कालवा सोलापूर यांना माहे जुलै, २०२३ मध्ये

निवेदन देवूनही अद्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर कालव्यासाठी आच्छादित क्षेत्रातून ०.५११ टी.एम.सी.पाणी उपलब्ध झाले असून भीमा-सिना जोड कालव्याचे उजनी जलाशयाच्या फेरनियोजनामध्ये समावेश करुन सदरचा प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही. तथापि, भीमा (उजनी) प्रकल्पाच्या पाण्याच्या सुधारीत फेर नियोजनाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन पत्र दि.१६/०४/२०२४ अन्वये, भीमा (उजनी) प्रकल्पाच्या पाणी वापराच्या सुधारीत फेर नियोजनाचे ताळेबंद मधील सविस्तर आकडेवारी अधीक्षक अभियंता, कृष्णा तंटा लवाद यांचेकडून तपासून घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोरगाव अंजनपुर निम्न पातळी बंधारा (ता. जि. लातूर) नविन उभे द्वार बसविण्याबाबत

**(१३) ७३७५० (१३-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरगाव अंजनपूर (ता.जि. लातूर) या बंधाऱ्यावर मुळी प्रकल्पाच्या धर्तीवर नवीन उभे उचलद्वार बसविण्याबाबतचा स्थापत्य व यांत्रिकी विभागाचा एकत्रित विशेष दुरुस्ती रु. १३.९५ कोटीचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मंजुरीकरिता मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी कार्यकारी संचालक,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.यांचेकडे सादर केला आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विशेष दुरुस्तीच्या प्रस्तावास त्वरित मंजुरी मिळण्याबाबत लोकप्रतिनिधी (केज, जि. बीड.) यांनी कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचेकडे दि. २६ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर मागणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
बोरगाव अंजनपूर, ता.जि.लातूर येथील निम्न पातळी बंधारा द्वार दुरुस्ती बाबत मुळी प्रकल्पाच्या धर्तीवर नवीन उभे उचल द्वारे बसविणेबाबतचा विशेष दुरुस्ती प्रस्ताव, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र दि.२१/०९/२०२३ अन्वये महामंडळ कार्यालयास सादर केलेला आहे.
सदर विशेष दुरुस्ती प्रस्ताव महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.०५/१२/२०२३ अन्वये अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक या कार्यालयास पाठविण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र दि.१८/१२/२०२३ अन्वये बोरगाव अंजनपूर निम्न पातळी बंधारा ता. जि. लातूर द्वार दुरुस्ती साठी विशेष दुरुस्ती अंतर्गत मुळी बंधाऱ्याच्या धर्तीवर नवीन उभे उचल द्वारे बसविण्याचे कामाच्या प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये मुद्दे उपस्थित केले होते. त्यानुषंगाने महामंडळाचे पत्र दि. २८/०२/२०२४ अन्वये, उपरोक्त मुद्यांची त्रुटी पूर्तता करून अनुपालन अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक यांना पुन्हा सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासनाच्या ३२ विभागांतील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१४) ७३७८८ (१९-०२-२०२४). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व श्रेणीतील एकूण मंजूर पदांच्या ३० टक्के पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शासनाच्या ३२ विभागांत ७ लाख २४ हजार ८०८ अधिका-यांची पदे मंजूर असून त्यातील ४ लाख ८३ हजार ८९५ पदे भरलेली आहेत तर २ लाख ३९ हजार ९०३ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरक्षित प्रवर्गापैकी इतर मागास प्रवर्गाची (ओबीसी) १६ टक्के पदे रिक्त असल्याची माहिती वित्त विभागाने जाहीर केलेल्या शासकीय कर्मचा-यांच्या आकडेवारीतून समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ३० टक्के रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (२०-०६-२०२४) :** (१), (२) व (३) असे निदर्शनास आले नाही.

(४) देशाच्या ७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्ताने मंत्रालयीन प्रशासकीय विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना शासन निर्णय दि.३१.१०.२०२२ अन्वये १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत ज्या विभागांचे सुधारित आकृतीबंध अंतिम झाले आहेत त्यांच्या बाबतीत सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे १०० टक्के भरण्यास अनुमती देण्यात आली होती. तसेच, ज्या विभागांचे सुधारित आकृतीबंध अंतिम झालेले नाहीत त्यांचेबाबतीत गट-अ, गट-ब व गट-क मधील (वाहनचालक वगळून) सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली होती. सदर कालावधी आता संपुष्टात आला असल्याने शासन निर्णय दि.३०.९.२२ मधील तरतूदी लागू झाल्या आहेत. त्यानुसार ज्या विभाग व कार्यालये यांनी सुधारित आकृतीबंध उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने अंतिम केला आहे त्या विभागांना लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील सरळसेवेची १०० टक्के पदे भरण्याची अनुमती देण्यात आली आहे आणि लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील ५० टक्के पदे भरण्यास अनुमती देण्यात आली आहे. सर्व प्रशासकीय विभागांनी त्याप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ईसापूर ( ता.उमरखेड-महागांव, जि. यवतमाळ) धरणातून पाणी देण्याकरिता बिगर सिंचन प्रापण सूचीद्वारे मान्यता देऊल दुरुस्ती अंदाजपत्रक तयार करण्याबाबत**

**(१५) ७४००६ (१३-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ईसापूर ( ता.उमरखेड-महागांव, जि. यवतमाळ) धरणातून सन २०२३-२४ च्या रब्बी हंगामामध्ये पाणी देण्याकरिता अत्यावश्यक कामांना महामंडळाने बिगर सिंचन प्रापण सूचीद्वारे तातडीने मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन द्यावा व उर्वरित कामांचे विशेष दुरुस्ती अंदाजपत्रक तयार करुन तात्काळ सादर करणेबाबत उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय यांनी कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना दिनांक १३ सप्टेंबर,२०२३ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशानुसार विशेष दुरुस्ती अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे काय, त्यानुसार दुरुस्तीच्या कामाला केव्हापासून सुरुवात करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच तात्काळ दुरुस्ती अंदाजपत्रक सादर करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) होय.
(२) व (३)अतितातडीच्या रू.१४९.३८ लक्ष इतक्या कामांच्या प्रापणसूचीस मंडळ कार्यालयाचे पत्र दिं.५/२/२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. मंजुर प्रापणसूचीनुसार सदरील देखभाल व दुरुस्ती कामांची निविदा प्रक्रिया विभागस्तरावर प्रगतीपथावर आहे.
तसेच देखभाल दुरुस्ती अंतर्गत करावयाच्या कामाव्यतिरिक्त ऊर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड (बांधकाम मंडळ) तर्फे इसापूर डावा कालवा व इसापूर उजवा कालवा मधील क्षतिग्रस्त कालवा भराव व अस्तरीकरण विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्तावित आहेत.
सदर कामाचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून अंदाजपत्रके तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
सदर प्रस्ताव महामंडळाकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल
(४)प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोंड्ये (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे मुंबई-गोवा महामार्गावर दारु वाहतूक करणारा ट्रक पकडल्याबाबत

**(१६) ७४१५३ (१९-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंड्ये (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने मुंबई-गोवा महामार्गावर सापळा रचून दारु वाहतूक करणारा ट्रक पकडून तब्बल ८२ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारवाई करतांना मद्य माफियांकडून गोळीबार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मद्य माफियांवर कोणती कठोर कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (२२-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
प्रस्तुत प्रकरणी राज्य भरारी पथक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांनी दि. ०६.०९.२०२३ रोजी कारवाई करुन एकूण रुपये ८२.५५ लाख इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.
याबाबत महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अन्वये गु.र.क्र.३५९/२०२३ नुसार गुन्हा दाखल केला असून यामध्ये ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.
(२) व (३) सदर गुन्हयातील आरोपीने गोळीबार करुन दहशत निर्माण करणे व शासकीय कामकाजात अडथळा आणण्याचा प्रयत्न केल्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्याच्या फिर्यादीवरुन आरोपींविरुद्ध पो.स्टे. राजापूर, जि. रत्नागिरी येथे भारतीय दंड संहिता कलम ३५३, १४३, १४४, १४७, १४८, १४९, २२४ व २२५ सह भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३/२५ व २७ अन्वये गु.र.क्र.११९/२०२३ दाखल करण्यात आला आहे. सदरच्या गुन्ह्यात ९ आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकी (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील वसतिगृहातील पाच अल्पवयीन मुलींचे लैगिक शोषण झाल्याबाबत

**(१७) ७४२८५ (१४-०२-२०२४). श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकी (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील वसतिगृहातील पाच अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण झाल्याचा प्रकार

माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२४) :** (१) खडकी येथील वसतिगृहातील एकूण सहा अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) खडकी (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील वसतिगृहातील सहा अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण झाल्याबाबत एरंडोल पोलीस स्टेशन, जि.जळगांव येथे नोंद झालेल्या दोन गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.
१) गु.र.क्र.१४७/२०२३, भा.द.वि.क. ३५४, ३७६ (२) (ड) (एन) (क), ३७७, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ३, ४, ५, ६, ८, ९, १०, १२, १९, २१ सह अनुसूचित जाती व जमाती कायदा सुधारणा सन २०१५ चे कलम ३ (१) (अ) (ई) (व्ही) (डब्ल्यू) अन्वये दि.२६.०७.२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ३ आरोपी असून २ आरोपी अटक आहेत. आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.
२) गु.र.क्र.१५५/२०२३, भादवि ३७६ (२) (एन) (क), ३५४, ३२४, ३२३, ५०६ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ४, ५ (फ) (एल) (ओ), ६, ८, ९ (ए) (एल) (ओ), १९, २१ सह बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम सन २०१५ चे कलम ३ (१) (अ) (ई) (व्ही) (डब्ल्यू) अन्वये दि.०३.०८.२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ५ आरोपी असून १ आरोपी अटक आहे. आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील पाताळगंगा नदीच्या पूररेषेचा नव्याने आढावा घेण्याबाबत

**(१८) ७४५२३ (१४-०२-२०२४). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील पातळगंगा नदीची पूर रेषा ठरवताना वापरलेल्या निकषामुळे नदीलगतची जमीन असलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान होऊन तेथील विकास कामे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खालापूर हद्दीतून वाहणाऱ्या पातळगंगा नदीचे प्रवाहित पाणी हे खोपोली शहरातील टाटा हायड्रोलिक जनरेटिंग वीज निर्मितीसाठी वापरले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहेजुलै महिन्यातील मुसळधार पावसामुळे नदीने धोकादायक पातळी ओलांडल्याने पूरस्थिती निर्माण होते, परंतु सन १९८९ ला आलेल्या महापुराएवढी तीव्रता नसल्याने पाटबंधारे विभागाकडून पातळगंगा नदी लगत दर्शवण्यात आलेली पूर रेषा अवास्तव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, खालापूर नगरपंचायत हद्दीतील खालापूर, वनवे,निंबोडे, शिरवली व महाड येथील रहिवासी वस्ती व शेती असलेल्या भागांमध्ये पूर रेषा दर्शवण्यात आल्याने या गावातील ३०% पेक्षा अधिक जमीन पूर रेषेमुळे वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पूर रेषेचा नव्याने आढावा घेऊन येथील शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये व प्रलंबित विकास कामे पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय ,
(६) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.
(४) पाताळगंगा पूररेषा नकाशामध्ये खालापूर नगरपंचायत हद्दीतील खालापूर, वनवे, निबोंडे, शिरवली व महड ही गावे नदीजवळ असल्याने या गावातील एकूण १०४४.८४ हे. क्षेत्रापैकी २३२.३५ हे. (२२.२४% ) एवढे क्षेत्र पूररेषेत येत आहे. तसेच सदर पूररेषा आखणी ही जलसंपदा विभाग, शासन निर्णय, दि.०३.०५.२०१८ अन्वये भविष्यातील पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी करण्यात आली आहे. नदीच्या निळया वा लाल पूररेषेच्या अंतर्गत बांधकाम केल्यास नदीची नैसर्गिक पूर वहन क्षमता कमी होते व त्यामुळे पाणी आजूबाजूच्या भागात पसरते. त्यामुळे सदर जागेवर बांधकाम करणे धोक्याचे असते.
(५) सदर पूररेषा तांत्रिक धर्तीवर आधारल्या असल्याने व भविष्यातील पूराचा धोका टाळयाकरीता केले असल्याने याबाबत नव्याने आढावा घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंजवडी (पिंपरी) (जि.पुणे) येथील आयटी पार्कमध्ये अंमली पदार्थाची होत असलेली विक्री

**(१९) ७४७३४ (१७-०२-२०२४). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंजवडी (पिंपरी) (जि.पुणे) येथील आयटी पार्कमध्ये मेफेड्रॉन, अफू हे अंमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोघांना गुन्हे शाखेच्या पोलीसांनी दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांचेकडून तीन लाखा पेक्षा जास्त अमली पदार्थ जप्त केले असून सदर प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली, तसेच माहीती व तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणारे तरुण तरुणी व्यसनाच्या विळख्यात सापडू नये यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०२४) :** (१) व (२) दि.०७.०९.२०२३ रोजी हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दीमधील बावधन येथे मेफेड्रॉन व अफु वनस्पतीची सुकलेल्या पानाचा चुरा अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्री करीता बाळगल्याने दोघांवर हिंजवडी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करुन अटक करण्यात आले असुन सदर गुन्ह्यात रु.३,३९,५७५/- किंमतीचा अंमली पदार्थ साठा जप्त करण्यात आला आहे.
(३) सदर प्रकारणी हिंजवडी पोलीस ठाणे येथे दि.०८/०९/२०२३ रोजी गु.र.नं.१०५३/२३ एनडीपीएस कायदा कलम ८(क), १५ (ब), २२(क) व २९ अन्वये २ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
राज्यात अंमली पदार्थाच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत. जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालवधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स, पथनाट्यद्वारे तसेच e-pledge द्वारे जनजागृती केली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बांद्रा (पू ) निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभागाची ओ.पी.आणि क्यू. विभागाची कार्यालये उड्डाणपुलाच्या कामाकरिता तोडल्याबाबत

**(२०) ७४९७३ (२०-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांद्रा (पू ) येथे निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभागाचे ओ.पी.आणि क्यू. विभागाची कार्यालये सन २०१७ साली उड्डाण पुलाचे काम सुरू करताना तोडली, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, पी विभाग कार्यालय बांद्रा शासकीय वासाहतीतून तर इतर दोन कार्यालये मोकळ्या जागेत कंटेनर मध्ये सुरू आहेत, हे खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुंषगाने कार्यालयासाठी नवीन इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०७-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

अ) निरीक्षक, राउशु, पी विभाग, मुंबई उपनगर यांचे कार्यालय, शासन आदेश दि.१३.०१.२०२० नुसार वांद्रे शासकीय वसाहतीमधील वाटप केलेल्या ठिकाणी कार्यरत आहे.

ब) निरीक्षक, राउशु, ओ व क्यू विभाग, मुंबई उपनगर ही दोन कार्यालये कलानगर जंक्शन, वांद्रे (पू) येथील मोकळ्या जागेत "पोर्टा केबिन" येथे कार्यरत आहेत.

(३) निरीक्षक, राउशु, ओ व क्यू विभाग, मुंबई उपनगर यांचे कार्यालयासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास, प्राधिकरण यांचेकडून कलानगर जंक्शन, वांद्रे (पू) येथे नवीन इमारत बांधून देण्यात येत आहे. सदर इमारतीचे काम सुरु असून अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) प्रांत कार्यालयाअंतर्गत कुशिवली धरणाचा सुधारित अंदाजपत्रकानुसार नव्याने भूसंपादन करण्याबाबत**

**(२१) ७५०६० (१०-०२-२०२४). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर प्रांत कार्यालयाअंतर्गत हाजीमलंग परिसरातील कुशिवली धरणाचा खर्च सुधारित अंदाजपत्रकानुसार सुमारे १७७ कोटींवर गेल्याचे तसेच या प्रकल्पाकरिता नव्याने भूसंपादन करण्यात येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारित अंदाजपत्रकास शासनाने मंजुरी दिलेली आहे काय तसेच नव्याने भूसंपादन करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

कुशिवली धरण योजनेला शासन निर्णय दि. ०२.०६.२००३ अन्वये रु. २०.३५ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली असून रू. १७७.६८ कोटी रक्कमेचे प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकावर वित्त व नियोजन विभागाकडुन दि. १२/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या मुद्द्यांची शेरेपूर्तता प्राप्त असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच प्रकल्पांतर्गत नव्याने भुसंपादन करण्याचे नियोजित नाही.

(२) प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

तसेच प्रकल्पांतर्गत नव्याने भुसंपादन करावयाची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुमरी (ता.शहापूर, जि.ठाणे)धरणाच्या भूसंपादन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याबाबत

**(२२) ७५०६५ (१४-०२-२०२४). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मुमरी धरणाची प्रशासकीय मान्यता मिळून सात ते आठ वर्ष होऊन सुद्धा आजतागायत या धरणाचे काम सुरु नसल्याचे दिसून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाच्या भूसंपादन प्रक्रिया स्थगित झाल्याने तेथील शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भूसंपादन क्षेत्र ठरविताना अनियमितता झाली असून सदर भूसंपादन प्रक्रिया स्थगित होण्यास, भूसंपादन अधिकारी, जलसंपदा विभागाचे अभियंता व भूमी अभिलेख हे जबाबदार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित असलेले अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करण्यासह सदर भूसंपादन प्रक्रिया तात्काळ सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

मुमरी धरणाचे ४० % काम पूर्ण झाले असून सद्यस्थितीत उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

मौजे सारंगपुरी, खैरे व कोठारे या गावातील जमिनीचा निवाडा जाहिर करण्यात आला असून उर्वरीत भूसंपादन कार्यवाही भूसंपादन अधिनियम, २०१३ अन्वये करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गिरोला गाव तलाव क्रं १ व हातनी गाव तलाव क्रं २ ( ता. चिखली ) येथील धरणास हातणी नदीतून पाणी सोडण्याबाबत

**(२३) ७५३४२ (१३-०२-२०२४). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरोला येथे गाव तलाव क्रं १ व हातनी गाव तलाव क्रं २ (ता. चिखली) येथे कमी पर्जन्यामुळे दर वर्षी सदर तलाव भरत नसल्याने परिसरात सिंचन होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हातनी गावा जवळून जाणाऱ्या नदीतून पावसाळ्यात पुराचे पाणी वाहून जात असून नदी पासुन दोन्ही गाव तलावांचे अंतर एक ते दीड किलोमीटर असल्याने सदर नदीतून पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी लिफ्ट करून गाव तलाव भरल्यास दोन्ही ठिकाणच्या परीसरात सिंचन होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही कामांचे सर्वेक्षण करून पाणी लिफ्ट करण्याच्या कामास जिल्हा वार्षिक योजना किंवा नावीन्य पूर्ण योजने अंदाज पत्रक मागवून सदर कामास मान्यता देण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता सिंचन जिल्हा परिषद बुलडाणा यांचे कडे लेखी स्वरूपात केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (१८-०६-२०२४) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

मौ. गिरोला ता. चिखली येथे विभागांतर्गत पाझर तलाव व हातणी येथे गाव तलाव आहे. गाव तलावामधून कोणतेही सिंचन होत नाही. तथा पाझर तलावामधुन अप्रत्यक्ष सिंचन होते. दोन्ही तलाव सुस्थितीत आहे. सरासरी एवढे पर्जन्यामान झाले तरी दोन्ही तलाव पूर्ण सिंचन पातळीपर्यंत भरतात. परंतु जर कमी पर्जन्यमान झाले तर दोन्ही तलाव पूर्ण संचय पातळीपर्यंत भरत नाही.

(२) गाव तलावावरुन सिंचन होत नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(३) अशा प्रकारची कोणतीही मागणी स्थानिक नागरीक, सन्माननीय लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, बुलडाणा / कार्यकारी अभियंता सिंचन जि.प. बुलडाणा यांचेकडे लेखी स्वरुपात केलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यात गांजा तस्करीचे प्रमाणात वाढ झालेली असल्याबाबत

**(२४) ७५४०७ (२०-०२-२०२४). श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील अमली पदार्थ मध्ये गांजा तस्करीचे गेल्या सहा वर्षाच्या तुलनेत वाढ झालेली असल्याचे दिनांक २८ ऑक्टोबर २०२३ रोजी वा त्यासुमारास पोलिसांच्या आढाव्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गांजा तस्करीला आळा घालण्याच्या दृष्टिकोनातून गृह विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०२४) :** (१) होय,

(२) जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा जिल्हास्तरीय Ncord समितीच्या बैठकीमध्ये अंमली पदार्थांना प्रतिबंध करण्याकरीता उपाय योजना करणे बाबत सूचना देण्यात येतात. तसेच पोलीस प्रशासन, कृषीविभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या मार्फतीने संयुक्त दरमहा मोहीम राबवून अवैधरित्या गांजा विक्रि करणारे, बाळगणारे, शेती करणारे लोकांवर गोपनिय माहिती काढून संबंधीतावर कायदेशीर कार्यवाही केली जाते. तसेच पोस्ट ऑफिस यांच्या मार्फतीने येणाऱ्या पार्सल यांची योग्य तपासणी केली जाते. तसेच दरमहा केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याकरीता मिटींगचे आयोजन करण्यात येते.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत. जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालवधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स, पथनाट्यद्वारे तसेच e-pledge द्वारे जनजागृती केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार शहरातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शहरात ठिकठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसविण्याबाबत

**(२५) ७५४३७ (१९-०२-२०२४). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि विविध गुन्ह्यातील आरोपींचा माग घेण्यासाठी वसई-विरार शहरातील प्रमुख महत्वाच्या ठिकाणी, मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वसई-

नालासोपारा-विरार फाटा इत्यादी ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसवण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्याने दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ रोजी तसेच तद्नंतर दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे मान. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वसई-विरार शहरातील गुन्हेगारांचा माग काढण्याकरिता मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील विरार फाटा, शिरसाड नाका, कनेर फाटा, मांडवी पोलीस ठाणे, वज्रेश्वरी रोड असे एकूण ०९ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लोकसहभागातून लावण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रस्तावित लघु पाटबंधारे योजना लंगडाअंबा (खडक नाला), ता.यावल, जि.जळगांव या प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(२६) ७५६२१ (१४-०२-२०२४). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल (जि.जळगाव) तालुक्यातील प्रस्तावित लघु पाटबंधारे योजना लंगडाअंबा (खडक नाला), प्रकल्पास पाणी उपलब्धत करुन देण्याबाबतचा प्रस्ताव जलविज्ञान, नाशिक यांच्याकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयाकडे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदर प्रकल्पास तात्काळ पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळण्यादेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०४-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव महामंडळाचे पत्र क्र,जा.क्र.तापाविम/ पेशा-५/३५९५/सन २०२२, दि. १३/०९/२०२२,च्या पत्रान्वये मुख्य अभियंता, जलविज्ञान नाशिक यांचे कडे सादर करण्यात आला होता. त्यावर उपस्थित शेरे व सदर शे-यांची पूर्तता करण्यात आलेली होती.सदर प्रस्तावावर पुनश्चः मुख्य अभियंता,जलविज्ञान,नाशिक यांचे पत्र क्र.मुअ/जवधसु तांशा-४/ (३५४/२००८)/१०३ सन२०२३ दि.१७/०१/२०२४ अन्वये शेरे उपस्थित करण्यात आले आहेत. सदर शेऱ्यांची पूर्तता करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यावल ( जि.जळगांव ) येथील शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पातील प्रस्तावित उपसासिंचन योजनेस मान्यता मिळण्याबाबत**

**(२७) ७५६२३ (१३-०२-२०२४). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल ( जि.जळगांव ) तालुक्यातील तापी नदीवरील शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पातील पाणी उपसा करुन

प्रस्तावित उपसासिंचन योजनेव्दारे १९ गावाच्या एकुण ९१२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाचा लाभ होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पातील प्रस्तावित उपसासिंचन योजनेस मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव अप्पर मुख्य सचिव, जलसंपदा यांचेकडून उपमुख्यमंत्री कार्यालय यांचेकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयाकडे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
यावल, (जि.जळगांव) येथील शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पातील प्रस्तावित उपसासिंचन योजनेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.उपमुख्यमंत्री(जलसंपदा) यांच्या मान्यतेनंतर मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सादर केलेला आहे.
(३) होय, हे खरे आहे.
दि.२८.०२.२०२३ रोजीच्या निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे मागणी केलेली आहे.
(४) यावल, (जि.जळगांव) येथील शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पातील प्रस्तावित उपसासिंचन योजना या योजनेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्ह्यातील निम्न तापी पाडळसरे प्रकल्प केंद्र शासनाच्या बळीराजा व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्याबाबत

**(२८) ७५६२६ (१४-०२-२०२४). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील निम्न तापी पाडळसरे प्रकल्पाचे टप्पा-१ चे सर्व कामे पुर्ण करण्यासाठी २८७०.३२ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून दरवर्षी अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी केली जाणारी अल्प निधीची तरतूद बघता या प्रकल्पाच्या बांधकामाच्या व इतर कामांमध्ये आवश्यक ती प्रगती दिसून येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेचे काम तातडीने पूर्ण होण्याकरीता सदरची योजना केंद्र शासनाच्या बळीराजा व मा. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयाकडे दि. २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन तापी पाडळसरे प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
१.१.निम्न तापी प्रकल्पास रू.४८९०.७७ कोटी रकमेस दि.५.१.२०२४ च्या शासन निर्णयान्वये चतुर्थ सुप्रमा मान्यता प्राप्त झाली आहे. यामध्ये निम्न तापी टप्पा क्र.१ ची किंमत रू. ३१११.२१ कोटी आहे. प्रकल्पावर आजपर्यंत रू. ७८६ कोटी इतका निधी शासनाकडून उपलब्ध करण्यात आला आहे.
१.२.सद्य:स्थितीत प्रकल्पाची कामे प्रगतीत असून स्थापत्य कामे ४५% तसेच यांत्रिकी कामे ४५% पूर्ण झालेली आहेत.
१.३.वार्षिक आखणी सन २०२३-२४ मध्ये शासनाने रू. १०० कोटी तसेच दीर्घ मुदतीचे बिनव्याजी कर्ज रू. २०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला आहे.

१.४.राज्याच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार व मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशातील निधी वाटपाच्या सूत्रानुसार महामंडळास उपलब्ध होत असलेल्या नियतव्ययातून प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(२) होय.

निम्न तापी प्रकल्पाचा समावेश केंद्र शासन पुरस्कृत PMKSY योजनेत करण्याबाबत दि.१६.२.२०२३ रोजीचे स्थानिक लोकप्रतिनिधीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) शासनाच्या दि.७.१०.२०२१ व दि.१.४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये निम्न तापी प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत समावेश करण्यासाठी केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासनाच्या PMKSY योजनेत समावेश होण्यासाठी प्रकल्पास Investment clearance ची आवश्यकता आहे.

त्याअनुषंगाने शासनाच्या दि.३.१.२०२४ च्या पत्रान्वये Investment clearance चा प्रस्ताव केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उध्दभवत नाही.

---

**राज्यातील जलसंपदा विभागातील रिक्त पदाबाबत**

**(२९) ७५६९७ (१७-०२-२०२४). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३ मध्ये जलसंपदा विभागातील गट क व गट ड वर्गाची नोकर भरती झाल्यानंतर पुढील १० वर्ष जलसंपदा विभागामध्ये भरती न झाल्यामुळे सुमारे सोळा हजार पदे रिक्त असून कामकाजावर प्रतिकूल परिणाम झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दुष्काळी परिस्थिती व पाणीटंचाईवर मात करण्याकरिता जलसंपदा विभागतील रिक्त पदे भरुन विभागाची कार्यक्षमता वाढविण्याची मागणी लोकप्रतिनिधी व कृषी पदविकाधारक संघर्ष समितीकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जलसंपदा विभागातील रिक्त पदे त्वरीत भरण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०२४) :** (१) जलसंपदा विभागात वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील पदे सन २०१३ मध्ये भरण्यात आली होती, आता शासनाचा ७५,००० रिक्त पदे भरण्याच्या मानस असल्याने, जलसंपदा विभागातील ४४९७ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे.

(२) लोकप्रतिनिधीकडून रिक्त पदे भरण्याची मागणी होत आहे.

(३) जलसंपदा विभागाधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील गट-क मधील रिक्त पदे भरणेच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाच्या दिनांक १७.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये प्रादेशिक स्तरावर निवड समिती गठीत करण्यात आली असून, दिनांक २७.०१.२०२३ अन्वये समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे. गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील सरळसेवेच्या भरतीसाठी एकूण ५५७० पदसंख्या निश्चित करण्यात आली असून ती शासनपत्र दिनांक ०३.०४.२०२३ अन्वये समन्वय समितीस कळविण्यात आली आहे. त्यानुषंगाने दिनांक ०१.११.२०२३ रोजी एकूण ४४९७ पदांच्या सरळसेवा भरतीकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. दिनांक २७.१२.२०२३ ते ०२.०१.२०२४ या कालावधीत विविध संवर्गातील परीक्षा घेण्यात आली असून त्याबाबत सामान्य निकाल जलसपंदा विभागाच्या वेबसाईटवर दिनांक ०३.०३.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. नियुक्तीबाबतची पुढील कार्यवाही समन्वय समिती मार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अतिशोषीत मोर्शी व वरुड (जि. अमरावती) तालुक्यात पाण्याची पातळी वाढविण्याबाबत

**(३०) ७५७५५ (१४-०२-२०२४). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मोर्शी विधानसभा मतदार संघात समाविष्ट असलेली वरुड व मोर्शी दोनही तालुके सन २००४ पासुन अतिशोषीत आहेत हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, तालुके अतिशोषीत मुक्त करण्यासाठी जमीनीमध्ये पाणी झिरपण्यासाठी शासनाकडुन कोपब, सिमेंट नाला बांध (व्दारयुक्त बिनाव्दारयुक्त) इत्यादी वेगवेगळी कामे शासनाकडुन मंजुर करण्यात आलेली असून सदर कामाला शासनाकडून स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दिलेल्या कामाची स्थगिती उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यातयेत आहे,

(४) तसेच अतिशोषीत मोर्शी व वरुड तालुक्यात पाण्याची पातळी वाढविण्यासाठी शासनाने कोणती कायमस्वरुपी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१८-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून मोर्शी व वरुड तालुक्यातील जलसंधारणांच्या कामांची दि. ०४.०८.२०२३ रोजी स्थगिती उठविण्यात आली आहे.

(४) मोर्शी व वरुड तालुका अतिशोषीत असल्यामुळे सदर भागामध्ये जलसंधारणाची कामे करुन भूजल पातळीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे उपाययोजना म्हणून विभागामार्फत मोर्शी व वरुड तालुक्यामध्ये सन २०१८ पासून कोपब /सिनाबांध इत्यादी जलसंधारणाची १०० कामे असून त्यामुळे ६६००.५४ स.घ.मी. पाणीसाठी निर्माण होत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती महानगरपालिका क्षेत्राच्या मूलभूत सोयी सुविधा करीता जिल्हा नियोजन आराखड्यात निधीची तरतूद करण्याबाबत

**(३१) ७५८१६ (११-०२-२०२४). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुभाष धोटे (राजूरा) : दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २१८ मधील प्रश्न क्रमांक ६८२९२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा नियोजन आराखड्यातून अमरावती महानगरपालिका क्षेत्राच्या मूलभूत सोयी सुविधा करता निधी वाढवण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा नियोजन बैठकीमध्ये सातत्याने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी यासाठी निधी वाढवून ३३ कोटी रुपयांचा निधी करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील अमरावती व बडनेरा शहरी भागाच्या विकास कामासाठी किमान रुपये ५० कोटीची तरतूद जिल्हा नियोजन आराखड्यात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०३-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे

(२) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन२०२३-२४ अंतर्गत नगर विकासाच्या विविध योजना राबविण्यासाठी रुपये ३४.५० कोटी इतका निधी अमरावती महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात आला होता.

(३) अमरावती जिल्ह्यातील नागरी भागाच्या विकास कामासाठी आर्थिक वर्ष २०२४-२५ करीता रुपये ५७.९९ कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**सातारा जिल्हयात मध्यम तसेच लघु सिंचन प्रकल्पाची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) ७५९२५ (१४-०२-२०२४). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयात मध्यम तसेच लघु सिंचन प्रकल्पाची कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामे सुरु असतांना पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे तांत्रिक कामांना विलंब होत असून ७० टक्क्याहून अधिक अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे. सातारा जिल्ह्यात मध्यम तसेच लघु सिंचन प्रकल्पाची कामे सुरु असून या मंडळांतर्गत ४ मध्यम प्रकल्प, ३ उपसा सिंचन योजना व ७ लहान प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) होय, अंशत: खरे आहे. पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे तांत्रिक कामे करण्यास मर्यादा येत आहेत. परंतू मंडळ कार्यालयाकडून कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून कामकाज करण्यात येत आहे.
(३ )गट - अ व गट-ब संवर्गातील रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने व पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
गट क संवर्गातील सातारा सिंचन मंडळ व सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा या दोन मंडळांतर्गत रिक्त असलेल्या ६७७ पदांपैकी ५६० पदे सरळसेवेने भरण्याच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीमार्फत दिनांक २७.१२.२०२३ ते दिनांक ०२.०१.२०२४ या कालावधीत विविध संवर्गातील परीक्षा घेण्यात आली असून त्याबाबत सामान्य निकाल जलसपंदा विभागाच्या वेबसाईटवर दिनांक ०३.०३.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. नियुक्तीबाबतची पुढील कार्यवाही समन्वय समिती मार्फत करण्यात येत आहे.
वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१.१०.२०२२ अन्वये गट- ड संवर्गातील पदभरतीवर निर्बंध घालण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू झाल्यानंतर नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा घेतलेला निर्णय**

**(३३) ७६२०२ (१९-०२-२०२४). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित**

**विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने तत्कालीन नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना व आताची नवीन निवृत्तीवेतन योजना लागू करण्यापूर्वी शासन सेवेत नियुक्तीसाठी जाहिरात दिलेल्या परंतु नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू झाल्यानंतर नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा निर्णय माहे मार्च २०२३ वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास केंद्र शासनाच्या या निर्णयाप्रमाणे राज्य शासनाने निर्णय घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यापूर्वी जाहिरात दिलेल्या व ही योजना लागू झाल्यानंतर शासन सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांनी केंद्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, केंद्र सरकारच्या धर्तीवर व मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश व उच्च न्यायालयाच्या निर्देशाची दखल व निर्णय घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे

**श्री. अजित पवार (०४-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) केंद्र सरकारच्या धर्तीवर व मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाची दखल घेऊन शासनाने दि.०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात निर्गमित झालेल्या प्रकरणी व दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्याबाबतचा शासन निर्णय दि.०२.०२.२०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर (जि. पुणे) या तालुक्यातील भीमा व घोडनदीवरील कोल्हापूर पध्दतीला बंधाऱ्यांच्या गळती लागल्याबाबत

**(३४) ७६४१४ (१७-०२-२०२४). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि. पुणे) या तालुक्यातील भीमा व घोड नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची ढापे (निडल्स्) खराब झाले असल्याने मोठया प्रमाणात पाण्याचा अपव्यप होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची गळती रोखण्यासाठी सुमारे ७८० ढाप्यांची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर बंधाऱ्यांची गळती रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

काही प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत आहे.

(२) अंशत: खरे आहे.

भीमा नदीवर शिरूर तालुक्यामध्ये शिवतक्रार म्हाळुंगी व आलेगाव पागा या २ को.प.बंधाऱ्यांसाठी यांत्रिकी विभागामार्फत सन २०१७-१८ ते २०२३-२४ पर्यंत १०५४ नवीन बर्गे पुरविण्यात आले आहेत व १००% पाणीसाठा करण्यात आला आहे.

घोड नदीवरील एकूण १४ को.प.बंधाऱ्यांवर असणाऱ्या एकूण ढाप्यांपैकी ५७४ ढापे खराब झाले आहेत. खराब झालेल्या ढाप्यांऐवजी नवीन ५७४ ढाप्यांची मागणी करण्यात आली असून सन २०२३-२४ बिगर सिंचन निधीमधून सदर बर्गे मे,२०२४ पर्यंत उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

आलेगाव पागा को.प.बंधाऱ्याच्या गळती प्रतिबंधक व मजबुतीकरण करण्याच्या कामास सिंचन पुनर्स्थापना निधीतून मंजुरी दिली असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

शिवतक्रार म्हाळुंगी को.प.बंधाऱ्याचे स्तंभ व उंबरठा दुरूस्ती व इतर अनुषंगिक कामांना सिंचन पुनर्स्थापना निधीतून मान्यता दिली असून सदर कामे लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर ( जि.पुणे, ता.शिरुर ) येथील डिंबा कालव्याच्या अपूर्ण कामांबाबत

**(३५) ७६४१५ (१७-०२-२०२४). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे, ता.शिरुर) या ग्रामीण परिसरातील सरदवाडी, तर्डोबाची वाडी व गोलेगाव डिंबा कालव्याच्या अपूर्ण कामांमुळे कालव्याचे पाणी ११६ कि.मी. पर्यंत पोहचत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपूर्ण कामांसाठी निधी असूनही भूसंपादनाअभावी कालव्याची अपूर्ण कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२४) :** (१) होय.

(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

शिरूर, जि. पुणे येथील डिंभे उजवा कालवा कि.मी. १०५ व १०६ मधील मातीकाम व बांधकामासाठी आवश्यक त्या जमिनीचे जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडुन दरनिश्चिती झालेले असुन लाभधारक शेतक-यांना मोबदला वितरीत करण्यात आलेला आहे. सदरचे मातीकाम व बांधकाम प्रगतीत आहे.

डिंभे उजवा कालवा सा. क्र. १०६/००० ते १०६/४१० या लांबीतील मातीकाम व बांधकामासाठीचा भूसंपादन प्रस्ताव थेट खरेदीने जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आलेला असुन उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २६ पुणे यांच्याकडे मुल्यांकन स्तरावर प्रगतीपथावर आहे. भूसंपादन प्रकरणाची दरनिश्चिती पुर्ण झाल्यानंतर लाभधारक शेतकऱ्यांना मोबदला अदा करुन सदर कामाची निविदा कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

तसेच, डिंभे उजवा कालवा सा. क्र. १०७/९२० ते १०८/०८० या लांबीतील अतिखोल खोदाईचे कामासाठीच्या भूसंपादन प्रकरणी जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत दि.१५/०९/२०२३ रोजी दरनिश्चिती करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने निधी उपलब्धतेनुसार लाभधारक शेतकऱ्यांना मोबदला अदा करण्यात येईल. सदरचे अतिखोल खोदाईचे काम प्रगतीपथावर आहे.

सदरील कामे पूर्ण करून कि.मी. ११६ पर्यंत सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भभवत नाही.

---

### चासकमान प्रकल्पाच्या शिरुर उपविभागात कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६) ७६४१६ (१७-०२-२०२४). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील चासकमान प्रकल्प शिरुर उपविभागात कालवा निरिक्षक, दप्तर कारकुन, बीटधारक अशी ९० टक्के पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपलब्ध कर्मचाऱ्यांवर ताण येवून आवर्तनाचे योग्य नियोजन होत नसल्याने पाण्याचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे तातडीने भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे. सदरचा उपविभाग बांधकाम प्रकारातून सिंचन व्यवस्थापन प्रकारात रुपांतर झालेला असल्याने सदर उपविभागात सिंचनाचे आकृतीबंधानुसार पद मंजूर नाहीत.

(२) सदर उपविभागास पदे मंजूर नसल्याने तसेच सिंचन कामाशी संबंधित कर्मचारी उपलब्ध नसले तरी आहे त्या कर्मचाऱ्यांकडून व बाह्य अभिकरणातून सिंचन आवर्तनाचे कामे करुन घेतली जातात.

(३) जलसंपदा विभागामार्फत पदांचा आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतीबंध निश्चित झाल्यानंतर त्यानुसार रिक्त पदे भरण्याची योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच सद्य:स्थितीत विभागांतर्गतची वर्ग-३ ची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबाजोगाई (जि. बीड) तालुक्याकरीता ग्रामीण -१ व ग्रामीण -२ नविन उपविभागाच्या प्रस्तावाबाबत

**(३७) ७६५२० (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि. बीड) तालुक्याकरिता ग्रामीण -१ व ग्रामीण -२ नवीन उपविभागाला RDS योजनेत प्रस्ताव तयार करून मंजुरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक २८ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीच्या ग्राहक मानंकाप्रमाणे ग्राहक संख्येचा निकष व आर्थिक दायित्वाचा विचार करुन सदर प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सपन नदी (ता.अचलपूर, जि.अमरावती) प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन झाले नसल्याबाबत

**(३८) ७६५३० (१७-०२-२०२४). श्री. बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सपन नदी (ता.अचलपूर, जि.अमरावती) या प्रकल्पातील धरण तथा कालव्यासाठी लागलेल्या ५०१ हेक्टर जमिनींपैकी ४८२.४७ हेक्टर जमीन याच भागातल्या शेतकऱ्यांनी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जैतादेही आणि वझर या दोन बाधित गावांचे पुनर्वसन झाले असून या प्रकल्पाद्वारे अचलपूर

तालुक्यातील ३३ आणि चांदूर बाजार तालुक्यातील २ गावांना सिंचनाचा लाभ मिळत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पात सन २०१०-२०११ पासून पाणी अडवले जात असून ६३८० हेक्टर प्रकल्पीय सिंचन क्षमता असलेल्या या प्रकल्पातून अद्यापही पूर्ण क्षमतेने सिंचन झाले नसून सिंचनाकरिता आवश्यक वितरिका व लघु कालव्याची कामे मागील १३ वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच पुनर्वसित गावांचे योग्यरीत्या पुनर्वसन झाले नसून पुनर्वसनाच्या अनेक कामात त्रुटी असल्याने पुनर्वसीत लोकांना त्याठिकाणी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर प्रकल्पातून सिंचन करण्याबाबत तसेच पुनर्वसित गावांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रकल्पातील धरण तथा कालव्यासाठी एकूण आवश्यक ६०१.५४ हे. जमीनीपैकी ५९६.५३ हे. जमीन याच भागातील शेतक-यांनी दिली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्रकल्पामुळे बाधीत जैतादेही आणि वझर या दोन गावांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षेत्र ( ICA) ६१३४ हेक्टर असून,या प्रकल्पाद्वारे अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील ३३ गावातील ५६७८ हे. व चांदुरबाजार तालुक्यातील २ गावातील ४५६ हे. क्षेत्रास(एकुण ३५ गावे) सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सन २०११ पासून या प्रकल्पांतर्गत सिंचन सुरू झाले असुन सद्यस्थितीत अचलपुर तालुक्यातील १७ आणि चांदुर बाजार तालुक्यातील १ असे एकुण १८ गावांना सिंचनाचा लाभ मिळत आहे.उर्वरित अचलपूर तालुक्यातील १६ व चांदुरबाजार तालुक्यातील १ अशा १७ गावांना सिंचनाचा लाभ देण्यासाठी कामे प्रगतीपथावर असून सदर कामे जून-२०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सपन मध्यम प्रकल्पाची एकुण सिंचन क्षमता ६३८० हे. असून, त्यापैकी ६२१० हे. सिंचन क्षमता(९७%) निर्मित झालेली आहे. उर्वरित १७० हे. सिंचन क्षमता जून २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) नाही, हे खरे नाही.

प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील जैतादेही आणि वझर या दोन बाधीत गावांचे पुनर्वसन व स्थलांतर अनुक्रमे मौजे धामणी व मौजे मल्हारा ता. अचलपूर येथे नागरी सुविधासह कामे पूर्ण करून सन २००८ मध्ये जिल्हारिषद यांचे कडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तेलंगणा सीमेवरी गोदावरी नदीवरील मेडीगड्डा कालेश्वर प्रकल्पाचे खचलेले बॅरेज

**(३९) ७६७२३ (१७-०२-२०२४). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र तेलंगणा सीमेवरी गोदावरी नदीवर तेलंगणा शासानाने ७ हजार कोटी रुपये खर्च करुन मेडीगड्डा कालेश्वर सिंचन प्रकल्पासाठी शासनाने ना-हरकत प्रमाणपत्र दिले तथापि,सदर प्रकल्पाचे बॅरेज खचल्याने ते फुटल्यास महाराष्ट्राच्या सीमेवरील अनेक गावं बुडण्याची भीती व्यक्त होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे बॅकवॉटरमुळे शेतकऱ्यांच्या बाधित होत असलेली जमिन गोदावरी नदी पात्रातील १२ गावांची संयुक्त मोजणी अहवालानुसार १२८.०४ हेक्टर आर खाजगी जमीन संपादनाचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना अद्याप अदा केला नसल्याचे निदर्शनास आले असून भूसंपादन अधिनियम २०१३ (सुधारणा नियम-२०१८) चे कलम (क) मधील तरतुदीनुसार जमीन संमती निवाडा करण्यासाठी भूसंपादन संस्था (पाटबंधारे विभाग तेलंगना राज्य) व भूसंपादन अधिकारी गडचिरोली यांच्या समवेत जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास बैठक आयोजित केली व सदरच्या बैठकीत संमती निवाडा पारित करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) तथापि, नॅशनल डॅम सेफ्टी ऑथॉरिटी पथकाने धरणाची पुनर्बांधणी करण्याचा अहवाल दिला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यस, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०२४) :** (१) महाराष्ट्र व तेलंगणा राज्याच्या मार्च-२०१६ मध्ये पार पडलेल्या आंतरराज्य नियंत्रण मंडळाच्या बैठकीत कालेश्वरम बहुउद्देशिय प्रकल्पाचा भाग म्हणून मेडीगड्डा बॅरेज प्रकल्पसंबंधी सामंजस्य करार करण्यात आला आहे.तेलंगणा शासनाच्या कालेश्वरम आंतरराज्यीय प्रकल्प अंतर्गत मेडीगड्डा बॅरेज प्रकल्पाचे बांधकाम जून २०१९ मध्ये तेलंगणा शासनामार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे.

तथापि, दि.२०/१०/२०२३ ला बॅरेजचा पृष्ठलादी (Deck Slab) खचल्याचे (Settle) आढळले. तसेच काही Piers ना तडा गेल्याचे (Hair Crack) दिसून आले. त्यामुळे बॅरेजचा पाणी साठा टप्याटप्याने कमी करण्यात आला व नंतर दि. २२/१०/२०२३ रोजी संपूर्ण बॅरेज रिकामा करण्यात आले.

त्यानुषंगाने दिनांक २३/१०/२०२३ रोजी केंद्रशासनाचे National Dam Safety Authority, Ministry of Jal Shakti, New Delhi चे ६ सदस्यांनी मुख्य बॅरेजचे स्थळाला भेट दिली. केंद्र शासनाचे National Dam Safety Authority, Ministry of Jal Shakti, New Delhi यांचे निरीक्षण टिप्पणीनुसार मेडीगड्डा बॅरेजचे मजबुतीकरण / पूनर्बांधणीचे काम होईपर्यंत बॅरेजची उपयुक्तता राहणार नाही असे स्पष्ट केले आहे.

तहसिलदार सिरोंचा यांनी त्यांचे पत्र दि. २९/११/२०२३ अन्वये मेडीगड्डा बॅरेज क्षतीग्रस्त झाल्याच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या सीमेवरील नदीकाठावरील कोणतेही गाव बुडीत झाले नसल्याचे कळविले असून पत्रामध्ये स्थानिक महसुल, पोलिस विभागाकडून तात्काळ प्रभावाने बॅरेज पुलावरुन होणारी वाहतूक पुढील आदेशापर्यंत थांबविण्यांत आली असल्याचे नमूद केले आहे.

(२) होय, उपविभागीय अधिकारी (राजस्व), अहेरी यांचे मार्फ़त भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय,हे खरे आहे.

(४) स्थानिक महसुल, पोलिस विभागाकडून सदर स्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. दोन्ही बाजूने तात्काळ प्रभावाने बॅरेजचे पुलावरुन होणारी वाहतूक पुढील आदेशापर्यंत थांबविण्यात आली आहे व बॅरेज मधील पाणीसाठा रिक्त केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हणेगाव (जि.नांदेड) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक यांच्या मनमानी कारभाराबाबत

**(४०) ७६८२६ (२०-०२-२०२४). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हणेगाव (जि.नांदेड) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक मधील अधिकारी व कर्मचारी हे मनमानी कारभार करीत असल्यामुळे शासनाच्या अनेक योजनांपासून जनतेला वंचित ठेवल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही वा कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२१-०३-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही.
हणेगाव (जि. नांदेड) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखेने पीक कर्ज वाटपामध्ये १३३९ शेतकऱ्यांना रु.११२२.१७ लक्ष पीक कर्ज वाटप केले आहे, जे उद्दिष्टाच्या १४३ टक्के आहे. शाखेने चालू आर्थिक वर्ष सन २०२३-२४ मध्ये प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजनेमध्ये (PMJJBY) ऑक्टोबर २०२३ अखेर ७५० चे ध्येय असतांना १६७३ लाभार्थ्यांना लाभ दिला असून एकूण उद्दिष्टाच्या हे प्रमाण २२३ टक्के इतके आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना (PMSBY) मध्ये ऑक्टोबर २०२३ अखेर १८०० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट असताना ३२७७ लाभार्थ्यांना लाभ दिला असून एकूण उद्दिष्टाच्या हे प्रमाण १८२ टक्के आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देगलूर नाका, नांदेड येथे प्लॉट ची परस्पर विक्री करुन केलेली फसवणूक

**(४१) ७६८२८ (२०-०२-२०२४). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहराच्या देगलुर नाका परिसरातील एका व्यापाऱ्यास ओळखीचा फायदा घेऊन त्याच्याच इमारतीत शाळा सुरू करून त्यावर कर्ज उचलून देतो असे सांगून त्याचा प्लॉट परस्पर विक्री करुन ४५ लाख ७० हजार २०० रुपयांची फसवणूक केली असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या गुन्ह्यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२४) :** (१) होय.
(२) व (३) होय,
प्रश्नाधीन घटनेच्या अनुषंगाने फिर्यादी यांच्या फिर्यादीनुसार इतवारा पोलीस स्टेशन, जि.नांदेड येथे गु.र.नं.३१७/२०२३ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ प्रमाणे दि.११.१०.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपी निष्पन्न झाले असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## पैनगंगा व काच (ता.रिसोड, जि.वाशिम) नदीचे खोलीकरण करण्याबाबत

**(४२) ७६८५६ (१७-०२-२०२४). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.राजेश**

**एकडे (मलकापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि. वाशिम) या तालुक्यातून वाहणाऱ्या पैनगंगा व काच नदीचे खोलीकरण करण्यास मान्यता मिळण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. उपमुख्यमंत्री यांना दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू निवेदनावर कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२४) :** (१) होय.

(२) जलसंपदा विभागाच्या दि.२५.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील नागरी व शहरी क्षेत्राच्या लगत वाहणा-या अधिसूचित नदयांची वहन क्षमता पुन:स्थापित करण्याचे धोरण व कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून त्यासोबतच्या परिशिष्ट क्र. १ मध्ये दर्शविण्यात आलेल्या नद्यांपैकी ज्या नद्यांच्या प्रवाहामध्ये गाळ साठून मोठया प्रमाणात अडथळे निर्माण झालेले आहेत, त्या नद्यामधील गाळ काढण्याची कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना दिल्या आहेत. तथापि, सदर परिशिष्टामध्ये पैनगंगा व काच नदयांचा समावेश नाही. त्यामुळे सदर नद्यांचे खोलीकरण करण्याची कार्यवाही, महसूल व वन विभागाच्या, दि.१९.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये वाळू /रेतीचे उत्खनन साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री याबाबतच्या सर्वंकष धोरण निश्चितीनुसार करण्याबाबत संबंधित क्षेत्रीय कार्यालयास दि.१६.०२.२०२४ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**काळम्मावाडी ( जि.कोल्हापूर ) धरणाच्या दुरूस्तीबाबत**

**(४३) ७७०८४ (१४-०२-२०२४). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळम्मावाडी ( जि.कोल्हापूर ) धरणाची दुरूस्तीक करण्यासाठी ८० कोटीचा निधी माहे ऑक्टोबर, २०२३ च्या सुमारास मंजूर झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निधी प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त धरणाची गळती काढण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे काय, सदरील काम केव्हापर्यंत पूर्ण होणे शासनास अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०३-२०२४) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

दूधगंगा (काळम्मावाडी) दगडी धरणाची गळती काढण्याच्या कामास शासन निर्णय दि.२७/१०/२०२३ अन्वये रू.८०.७२ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर कामासाठी सन २०२३-२४ च्या विशेष दुरूस्ती अंतर्गत वार्षिक आराखड्यामध्ये रू.१००० इतकी टोकन तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच सन २०२४-२५ च्या वार्षिक आखणीमध्ये विशेष दुरूस्ती अंतर्गत रू.३०.०० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

३)दूधगंगा (काळम्मावाडी) दगडी धरणाची गळती काढण्याच्या कामास अद्याप सुरूवात करण्यात आलेली नाही. सद्य:स्थितीत सदर कामाची निविदा दि.२०/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. दुधगंगा धरणातील गळती काढण्याचे काम माहे जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सासवड (जि.पुणे) येथील पुरंदर उपसा जलसिंचन योजनेच्या खराब पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(४४) ७७१६४ (१७-०२-२०२४). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सासवड, (जि.पुणे) येथील पुरंदर उपसा जलसिंचन योजनेच्या खराब पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे तसेच खराब पाण्यामुळे शेतीचेही मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पुरंदर उपसा जलसिंचनाद्वारे शुध्द पाणी पुरवठा होण्यासाठी कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

खडकवासला कॉम्प्लेक्समधून निर्माण होणाऱ्या पुर्नउद्भवावर पुरंदर उपसा सिंचन योजनेस वार्षिक ४.०० टी. एम. सी. पाणी वापरास मान्यता आहे. मुळा मुठा नदीमध्ये सांडपाणी सोडताना पुणे महानगरपालिका पुर्णत: प्रक्रिया करत नसल्यामुळे नदीतील पाणी दूषित होते.

पुरंदर उपसा सिंचन योजनेद्वारे वापरण्यात येणारे पाणी हे विना प्रक्रिया केलेले सांडपाणी असल्यामुळे लाभक्षेत्रातील जमीनी, तलाव, विहीरी, बोर इ. पाण्याचे स्त्रोत खराब होत आहेत. त्यामुळे पुणे महानगर पालिकेने पूर्ण सांडपाण्यावर आवश्यक गुणवत्तेपर्यंत प्रक्रिया करून सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वीर (ता.पुरंदर, जि. पुणे) येथे सुरू असलेले बेकायदेशीर अवैद्य धंदे बंद करण्याबाबत**

**(४५) ७७१६७ (२०-०२-२०२४). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीर (ता.पुरंदर, जि. पुणे) या गावी बेकायदेशीर दारु विक्री, मटका व जुगार हे अवैद्य धंदे सुरु असल्याने यामुळे महिला व नागरिकांना यांच्या सुरक्षेचा धोका निर्माण झाला असून देखील पोलीस याकडे दुर्लक्ष करित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे सुरु असलेले अवैध धंदे त्वरीत बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०२४) :** (१) पोलीसांचे दुर्लक्ष होत आहे ही बाब खरी नाही. वीर (ता.पुरंदर, जि. पुणे) हे गाव सासवड पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये येत असून सदर पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी यांनी गोपनीय बातमीदार यांचेमार्फतीने माहिती मिळवून ऑगस्ट, २०२३ मध्ये दारूबंदी बाबतचे २ गुन्हे, ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीमध्ये सोरट नावाच्या जुगाराचे एकूण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) अवैध धंदे बंद करण्याकरिता सन २०२३ मध्ये सासवड पोलीस स्टेशन अंतर्गत दारूबंदी बाबतचे ६९ व जुगार बाबतचे ३९ गुन्हे दाखल करण्यात आले असून अनुक्रमे रु. ५,२४,३००/- व रु. २,२५,४९५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अवैध धंदे बंद करण्याकरिता गोपनीय बातमीदाराकडून माहिती प्राप्त करून घेऊन अवैध धंदे करणारे, त्यांचे मालक

यांच्यावर कारवाई करून अवैध धंदे समूळ उच्चाटन करणेबाबत पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना देण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील वाढत्या गुन्हेगारीबाबत

**(४६) ७७२७६ (२०-०२-२०२४). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयात सन २०१७ ते २०२३ या कालावधीत ३०० मुले आणि अल्पवयीन १२७१ मुली असे एकूण १५७१ जण बेपत्ता असल्याची नोंद आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास,अवैध दारु व अवैध जनावरांची वाहतूकीच्या प्रकरणात ही वाढ झालेली आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास,स्थानिक पोलिस प्रशासनाकडून चंद्रपूर येथील वाढती गुन्हेगारीला आळा बसण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करुन कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०२४) :** (१) चंद्रपूर जिल्ह्यात सन २०१७ ते २०२३ या कालावधीमध्ये २६८ अल्पवयीन मुले आणि १२२५ मुली असे एकूण १४९३ जण बेपत्ता असल्याची नोंद असून त्यापैकी २५९ मुले आणि ११८७ मुली असे एकूण १४४६ जण मिळून आले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) चंद्रपूर जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्याकरिता जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशन हद्दीतील रहदारीचे ठिकाण, चौरस्ते, गर्दीची ठिकाणे येथे सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आले असून त्यांचे नियंत्रण पोलीस स्टेशन मधून करण्यात येते.
सदर सी.सी.टी.व्ही. प्रणाली आरोपींचा शोध घेणे, कायदा सुव्यवस्था अबाधीत राखण्याकरिता पोलीसांकडून उपयोगात आणली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोर (जि.पुणे) तालुक्यातील निरा-देवघर प्रकल्पाच्या उजव्या कालव्याच्या अस्तरीकरणास निधी मंजूर करण्याबाबत

**(४७) ७७३८२ (१७-०२-२०२४). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील निरा-देवघर धरणाच्या उजव्या कालव्याच्या एकूण १५८ कि.मी. पैकी ६५ कि.मी. मधील कालव्याचे काम पूर्ण झाले असून त्यातील कि.मी. ११ ते २२ या अंतराच्या कालव्याचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कालव्याच्या अस्तरीकरणाचे कामास अद्यापपर्यंत मंजुरी मिळाली नसल्याने सदर काम न झाल्यामुळे कालव्यातून पाण्याची गळती होवून शेतक-यांच्या जमिनींचे व उभ्या पिकांचे अनेक वर्षापासून अतिशय मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अस्तरीकरण करण्यासाठी त्वरीत निधी मंजूर करुन काम पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी उपमुख्यमंत्री यांना दि. २ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अदयाप शेतकऱ्यांचे होणारे नुकसान थांबविण्यासाठी कोणती

कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

निरा-देवघर धरणाच्या उजव्या कालव्याची कि.मी. ६५ पर्यंत मातीकामे पूर्ण असून कि.मी. १ ते १० चे अस्तरीकरण पूर्ण झाले आहे. कि.मी. ११ ते २२ मधील अस्तरीकणाची कामे प्रस्तावित आहेत.

सदर कालवा मातीच्या काट छेदामध्ये असल्याने त्यामधून पाण्याची गळती होत आहे. परंतु, त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे व उभ्या पिकांचे नुकसान होत नाही.

(३) व (४) होय, निरा देवघर पाटबंधारे प्रकल्पाच्या रु.३९७६.८३ कोटी किमतीस शासन निर्णय दि.०८/०३/२०२३ अन्वये तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर सुप्रमामध्ये अंतर्भूत असलेल्या कि.मी. १ ते कि.मी. ६५ च्या अस्तरीकरण कामांस रु.१९६.०१ कोटी तरतुद करण्यात आलेली आहे. निरा देवघर उजवा कालवा किमी १ ते किमी १० चे अस्तरीकरण पूर्ण झालेले असून कि.मी. ११ ते २२ मधील अस्तरीकरण कामाची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. निधी उपलब्धतेनुसार क्षेत्रीय स्तरावर उर्वरीत कामे करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कानंद गेव्हंडे-घिसर (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील उंच काठ रस्त्याचे कामासाठी भूसंपासदनाची करण्याबाबत

**(४८) ७७४०५ (१७-०२-२०२४). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गेव्हंडे (ता.वेल्हे,जि.पुणे) येथील गुंजवणी धरणाचे बांधकाम पूर्ण झाल्यामुळे तेथील पाणीसाठा पूर्ण क्षेमतेने होत असल्याने बाधीत प्रकल्पग्रस्तांना दळणवळणाकरीता अस्तित्वात असलेला रस्ता पाण्याखाली गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामस्थांना अन्य कोणताही रस्ता उपलब्ध नसल्यामुळे कानंद गेव्हंडे घिसर उंच काठ या रस्त्याच्या कामासाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येवून सदर रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांना निवदेन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर भूसंपादनाची कार्यवाही करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) होय.

(२) होय.

(३) मौजे कानंद-गेव्हंडे-घीसर उंच काठ रस्त्याकरीता आवश्यक जमीनीची भूसंपादनाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर येथे मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारण्याबाबत

**(४९) ७७६९१ (२१-०२-२०२४). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथे महसूल विभागाकडून सारथी संस्थेचे विभागीय मुख्यालय तसेच मुला-मुलींसाठी स्वतंत्र

वसतिगृहांसाठी गारखेडा परिसरातील जमीन नियोजन विभागास प्रदान करण्यास तसेच सदर प्रकल्पाच्या बांधकाम व संचालनाचे काम सारथी संस्थेमार्फत करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासकीय मान्यता देऊन एक वर्षाचा कालावधी होऊनही अद्याप यासंदर्भात कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन छ.संभाजीनगर येथे सारथी संस्थेचे विभागीय मुख्यालय व वसतिगृह तातडीने सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१०-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
नियोजन विभाग, शा.नि.क्र.सारथी -२०२३/ प्र.क्र.३१/क्र.१४२५, दि.१९.०३.२०२३ अन्वये सारथी संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय कार्यालयाचे व मुली-मुलींच्या वसतिगृहाच्या बांधकामास रु.१४०.२४ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

संपूर्ण महाराष्ट्रात सारथी प्रकल्पासाठी साम्य दिसण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोल्हापूर येथील सारथी कार्यालयाच्या बांधकामाच्या धर्तीवर नकाशे वापरण्याच्या सूचना होत्या. त्याप्रमाणे कामाचे सुधारित नकाशे तयार करुन सविस्तर स्थापत्य अंदाजपत्रकास व विद्युत अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात येवून दिनांक २१.११.२०२३ रोजी निविदा प्रकाशित करण्यात आली. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुचनेनुसार सारथी प्रकल्पाची कामे लवकरात लवकर व चांगल्या गुणवत्तेची व्हावी या कारणास्तव Joint Venture ची अट वगळण्यात येवून दिनांक २३.०१.२०२४ रोजी कामाची फेर निविदा प्रसिध्द करण्यात येवून दिनांक १५.०३.२०२४ रोजी बांधकामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत. काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## आर्वी (जि.वर्धा) येथील आर्वी,आष्टी व कारंजा तालुक्यातील कोल्हापुरी बंधाऱ्याचे कामे अर्धवट असतांनी पूर्ण देयके अदा केल्याबाबत

**(५०) ७९३०५ (०८-०२-२०२४). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) विधानसभा मतदार संघातील आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यात एकुण ४५ कोल्हापुरी बंधाऱ्याची कामे मंजुर करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंजुर असलेल्या ४५ बंधाऱ्यापैकी एकही बंधाऱ्याचे काम अजुन पर्यत पुर्णत्वास गेले नसल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंजुर बंधाऱ्यापैकी काही बंधाऱ्याचे कामे अर्धवट असतांना कंत्राटदाराकडून त्याचे पुर्ण देयक उचल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबधित दोषींवर कारवाई करण्यासह सदर बंधा-यांचे बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (१८-०६-२०२४) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

आर्वी (जि. वर्धा) विधानसभा मतदारसंघातील आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यात महामंडळ निधी अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये २१ को. प. बंधारे व सन २०२३-२४ मध्ये १४ को. प. बंधा-याच्या कामांना मंजूरी देण्यात आली. तसेच शासन निधी अंतर्गत २० को. प. बंधा-याच्या कामांना सन २०२३-२४ मध्ये मंजूरी देण्यात आली आहे. अशी एकूण ५५ को. प. बंधा-यांचे बांधकामाचे कामे मंजूर आहेत.

(२) होय, अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ मध्ये मंजूर २१ कामांपैकी १८ कामे पूर्ण झाली असून ३ कामे प्रगती पथावर आहे.

सन २०२३-२४ मध्ये शासन निधी अंतर्गत मंजूर १४ कामांपैकी ७ कामे पूर्ण झाली असून १३ कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच २०२२-२३ मध्ये जलसंधारण महामंडळांतर्गत १४ कामांच्या निविदा प्रक्रिया सुरु आहेत. तसेच शेतक-यांना बंधा-याच्या कामांमुळे काही त्रास होत असल्याचे आतापर्यंत निदर्शनास आले नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.